**वार्ताकन दिनांक - १८/१०/२०२४**

## २१ ऑक्टोबर पोलीस स्मृतिदिन-२०२४

दरवर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणुन देशभर पाळला जातो. या दिवशी संपुर्ण वर्षात आपले कर्तव्य बजावत असताना कामी आलेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांना पोलीस दलातर्फे मानवंदना देऊन श्रध्दांजली वाहण्यात येते. हा दिवस पोलीस दलाला अभिमानाचा,शौर्याला मानवंदना देण्याचा,त्याचबरोबर आपल्या जुन्या सहका-यांच्या स्मृतीने मन हेलावणाराही असतो.

२१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणुन पाळला जाण्यास १९५९ मध्ये लडाख भागातील सरहद्दीवर झालेली घटना कारणीभुत ठरली. भारत चीन सरहद्दीवर लडाख भागात १८ हजार फुट उंचीवर हॉट स्प्रिंग्ज नावाचे ठिकाण आहे. २१ ऑक्टोबर १९५९ या दिवशी हॉट स्प्रिंग्ज येथे गस्त चालु होती. गस्ती तुकडी नेहमीप्रमाणे गस्त घालण्यासाठी कुच करत हॉट स्प्रिंगच्या पुर्वेला ०६ मैल दुर ती आली असताना पर्वताच्या डाव्या बाजुला तुकडीच्या नेत्याला काही संशयास्पद खुणा दिसल्या. तुकडी त्या खुणांच्या अनुरोधाने पुढे चालु लागली आणि अचानक भयानक गोळीबार सुरू झाला. त्याठिकाणी पोलीस वीरांनी शौर्याने तोंड दिले. ही विशेष लढाई लढता-लढता यापैकी १० गस्ती शिपायांना वीरमरण आले व ९ जण जखमी अवस्थेत शत्रुच्या हाती सापडले. हे १० अमर शिपाई होते पुरणसिंग, धरमसिंग, इंगजित सुबा, नोरबु लामा, शिवनाथ प्रसाद, त्शेरिंग नोरबु, इमामसिंग, सवनसिंग, बेगराज आणि माखनलाल असे होते.

त्यावेळी केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या छावणीवरही अचानक चिनी सैन्यांनी हल्ला केला होता. या लढाईत कामी आलेल्या या शुर पोलीस जवानांपैकी पश्चिम बंगालचे-३, हरियाणा-२, पंजाब-२, उत्तर प्रदेश-२, हिमाचल प्रदेश-१ असे होते. ही बातमी वा-यासारखी सा-या देशभर पसरली. १३ नोव्हेंबरला चिनी सैनिकांनी या हुतात्म्यांचे मृतदेह भारताच्या ताब्यात दिले. १४ नोव्हेंबरला सकाळी ०८/०० वा. हॉट स्प्रिंग्ज येथे त्यांच्या वर सन्मानपुर्वक अंत्यविधी करण्यात आले. त्यावेळी प्रत्येक राज्यातील पोलीस दलांनी त्या त्या ठिकाणी या वीरांना श्रध्दांजली अर्पण केली.

त्यानंतर पाटणा येथे १९५९ साली झालेल्या अखिल भारतीय पोलीस स्पर्धांच्या वेळी सर्वांनी अशी शपथ घेतली. **‘आमच्या हया वीर हुतात्म्यांचे स्मरण आम्ही दरवर्षी २१ ऑक्टॉबरला पोलीस हुतात्मा दिन पाळुन करू’** आणि तेव्हापासुन दरवर्षी हा दिन भारत वर्षात मोठया सन्मानाने **‘पोलीस हुतात्मा दिन’** म्हणुन पाळण्यात येतो. राज्या-राज्यातुन पोलीस दले या हुतात्म्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी संचलन आयोजीत करून त्यांना मानवंदना देतात.

**दि.१ सप्टेंबर २०२३ ते ३१ ऑगस्ट २०२४** या कालावधीत देशातील सर्व राज्यात पोलीस दलाचे पोलीस जवान (सर्व दर्जाचे) असे एकुण **२१४** जवान यांनी आपले कर्तव्य बजावत असताना देह धारातीर्थी ठेवले. त्यामध्ये महाराष्ट्रातील **१.पोलीस उप निरीक्षक प्रकाश नाना शिंदे २.पोलीस कॉन्सटेबल राहूल गोपिचंद पवार ३.पोलीस कॉन्सटेबल वैभव सुनिल वाघ** अशा एकुण **०३** पोलीस जवानांचा समावेश आहे.

**मा.श्री.दत्ता पडसलगीकर माजी पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य** हे वरील हुतात्म्यांना दिनांक २१ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ०८/०० वा. पोलीस संशोधन केंद्र,पाषाण रोड,पुणे येथे श्रध्दांजली अर्पण करणार आहेत.सदर कार्यक्रमास मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.अमितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री.रंजनकुमार शर्मा व इतर वरिष्ठ पोलिस अधिकारी हे हजर राहणार आहेत.

तरी नागरीक व प्रसार माध्यमांना आवाहन करण्यात येते की,पोलीस हुतात्म्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी आपण दिनांक २१ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी **०७/५०** वा.चे पुर्वी पोलीस संशोधन केंद्र,पाषाण रोड,पुणे येथे उपस्थित राहावे.

सर्व वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी होणेस विंनती आहे.